# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

---

दि.०१/०७/२०२२

# <u>नागरीकांना आवाहन</u>

सर्व नागरीकांना या आवाहनाद्वारे सूचित करण्यात येते की, जन्म/मृत्यू घटनांच्या नोंदणीसाठी विविध प्रसार माध्यमातून समाजकंटकाद्वारे फसवी/ बनावट संकेतस्थळे (Websites) तयार करण्यात आली आहेत. यापैकी संकेतस्थळे 1) CRSORGIGOOVI.IN 2)CRSRGIIN.BIRTHDEATHONLINE.COM या नावाची आहेत.

ही संकेतस्थळे भारत सरकारच्या अधिकृत मूळ संकेतस्थळाची नक्कल करून तयार करण्यात आली असून ती भारत सरकारच्या अधिकृत मुळ संकेतस्थळासारखीच आहेत. यावरून जन्म/ मृत्यू प्रमाणपत्रे देखील तयार होतात. त्यासाठी नागरिकांकडून Online फोनवरून मागणी करून रक्कम घेतली जाते.

नागरिकांनी या संकेतस्थळांवरून कोणत्याही प्रकारे घटनांची नोंदणी करू नये अथवा Online रक्कम भरू नये.

जन्म अथवा मृत्यू घटनांची नोंदणी करण्यासाठी ग्रामीण भागात ग्रामसेवक, शहरी भागात मुख्याधिकारी नगर परिषद/ नगर पंचायत, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका, कार्यकारी अधिकारी, कटक मंडळे (कॅन्टोनमेन्ट बोर्ड), शासकीय आरोग्य संस्थेचे प्रमुख (जर घटना शासकीय आरोग्य संस्थेत घडली असेल तर) यांचेशी संपर्क साधावा.

वर नमूद केलेल्या संकेतस्थळावरून (Websites) जन्म/मृत्यू घटनांच्या नोंदणीबाबत कोणतीही कार्यवाही करू नये.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**